दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद
आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा
संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड
PUNE : Volume No. 1, Issue No. 174, Marathi Daily Friday, Date - 02 January 2026 Price 2 Rupees, Pages - 4
पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक १७४ वा | मराठी दैनिक | शुक्रवार दि. ०२ जानेवारी २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**
जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.
सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.
महिला संवाद
कार्यालय
साप्ताहिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

**पाहिजेत**
महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.
अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३
संपर्क - 9168567111
वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# तंबाखूच्या कारणावरून वाद, पुढे हत्या

## नववर्षाच्या पहिल्याच दिवशी रक्तरंजित घटना; किरकोळ वादातून व्यक्तीची हत्या

**अकोला । प्रतिनिधी**

शहरात नववर्षाचे स्वागत सुरू असतानाच एक धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. शहरातील कृषीनगर परिसरात केवळ तंबाखू खायला न दिल्याच्या कारणावरून एका व्यक्तीची हत्या झाल्याची घटना घडली असून, त्यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

या घटनेत संतोष भगवंतराव घावडे यांचा मृत्यू झाला आहे. तर राम कैलाश गिराम असे आरोपीचे नाव असून, त्याला अकोला पोलिसांनी (-ज्ञेश्र झेश्रळलश) ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संतोष घावडे आणि राम गिराम यांच्यात तंबाखूच्या कारणावरून वाद झाला होता. सुरुवातीला शाब्दिक वादाने सुरुवात झालेल्या या घटनेने काही वेळातच गंभीर वळण घेतले.

वाद अधिक चिघळल्यानंतर दोघांमध्ये झटापट झाली. या दरम्यान आरोपी राम गिराम याने लोखंडी पाईपने संतोष घावडे यांच्या डोक्यावर हल्ला केला. या हल्ल्यात संतोष घावडे गंभीर जखमी झाले. नागरिकांनी तत्काळ मदत करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.



घटनेची माहिती मिळताच अकोला पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. आरोपी राम गिराम याला अटक करण्यात आली असून, त्याच्याविरोधात हत्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी घडलेल्या या रक्तरंजित घटनेमुळे कृषीनगर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी अशा किरकोळ कारणांवरून घडणाऱ्या हिंसक घटनांबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. दरम्यान, या घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पोलीस प्रशासनाकडून परिसरात बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

## थोडक्यात...

### आता मराठीचा पुळका, भाजप नेत्याचा मोठा युटर्न

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकांच्या तोंडावर सध्या सर्वत्र उत्तर भारतीय महापौर या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भाजप नेते कृपाशंकर सिंह यांनी येत्या काळात मुंबईचा महापौर हा उत्तर भारतीय झाला पाहिजे, असे विधान केले होते. त्यावरुन मोठा वाद निर्माण झाला होता. आता कृपाशंकर सिंह यांनी याबद्दल अखेर आपली सविस्तर भूमिका मांडली आहे. विरोधकांनी मराठी आणि हिंदी भाषेचा वाद उकरून काढू नये, असा थेट इशारा कृपाशंकर सिंह यांनी दिला आहे. मराठी ही केवळ आमची भाषा नाही, तर ती आमची संस्कृती आहे, असे कृपाशंकर सिंह म्हणाले.

काही दिवसांपूर्वी मीरा-भाईंदरमध्ये उत्तर भारतीय मोर्चाच्या वतीने एका मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपस्थित समुदायाने मीरा-भाईंदरमध्ये उत्तर भारतीय समाजाचा महापौर कधी बसणार? असा सवाल केला होता. त्यावर भाष्य करताना कृपाशंकर सिंग म्हणाले होते की, जर तुम्हाला तुमचा महापौर हवा असेल, तर आधी मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आणा. या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला. यावेळी विरोधकांनी विशेषतः शिवसेना ठाकरे गट, मनसेने भाजपवर जोरदार टीका केली होती. भाजप मराठी माणसाचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. आज याबद्दल कृपाशंकर सिंह यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी या सर्व आरोपांचे खंडन केले. मी महाराष्ट्रात आलो, इथल्या मातीने मला मोठे केले. मराठी भाषेबद्दल आमच्या मनात नितांत आदर आहे. माझी मराठी बोलताना काही चुका होत असतील, पण मी ती मनापासून आणि भावनेतून बोलतो. माझ्या मराठी प्रेमाची कुणीही परीक्षा घेऊ नये, असे कृपाशंकर सिंह म्हणाले.

लोकांनी एक भावना व्यक्त केली होती, त्याला मी लोकशाहीतील संख्याबळाच्या आधारावर उत्तर दिले. परंतु, अंतिम निर्णय हा महायुतीचे सर्व ज्येष्ठ नेते एकत्र बसून घेतील. वैयक्तिक इच्छांपेक्षा पक्षाचे धोरण सर्वोच्च असते. मुंबईचा महापौर हा मराठीच असायला हवा आणि तो हिंदूच असायला हवा, ही आमची स्पष्ट भूमिका आहे, असे कृपाशंकर सिंह यांनी खडसावून सांगितले. संजय राऊत हे खासदार आहेत, मोठे नेते आहेत. त्यांनी बोलताना भान ठेवले पाहिजे. निवडणुका जवळ आल्या की काही लोकांना मुंबई आणि प्रांतवादाची आठवण येते. माझा व्हिडिओ जाणूनबुजून चुकीच्या पद्धतीने व्हायरल करून समाजात तेढ निर्माण केली जात आहे, असेही कृपाशंकर सिंह म्हणाले. दरम्यान मीरा भाईंदरमध्ये मराठी आणि उत्तर भारतीय मतदारांची संख्या मोठी आहे. कृपाशंकर सिंग यांनी एका बाजूला उत्तर भारतीय समाजाला संख्याबळ वाढवण्याचा सल्ला देऊन त्यांना प्रोत्साहित केले, तर दुसऱ्या बाजूला मराठी ही संस्कृती असल्याचे सांगून मराठी मतदारांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.

# नवऱ्याने बंडखोरी केली, बायको घरच सोडून माहेरी गेली

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यभरात महापालिका निवडणुकीची धामधूम आहे. अनेकांनी महत्प्रयासाने उमेदवारी मिळवून अर्ज भरला आहे. तर काहींचं तिकीट कापल्याने त्यांना बंडखोरी करावी लागली आहे. आता या बंडोबांना थंड करण्याचं काम सर्वच पातळीवरून होत आहे. स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही या बंडखोरांना शांत करण्याचा प्रयत्न करत आहेत. राज्यभरातच या बंडखोऱ्या झाल्या आहेत. मात्र, नागपूरमधील बंडखोरी सध्या चांगलीच चर्चेत आहे. नवऱ्याने पक्षात बंडखोरी केल्याने बायको नाराज झाली. तिने थेट नवऱ्याचं घरच सोडलं अन् माहेर गाठलं आहे. त्यामुळे नागपुरात खळबळ उडाली असून चर्चांना उधाण आलं आहे.

भाजपमधील बंडखोरीचा थेट परिणाम माजी महापौर अर्चना डेहनकर यांच्या घरीच पाहायला मिळाला आहे. नवऱ्याने बंडखोरी केल्याने अर्चना डेहनकर घर सोडून भावाच्या घरी गेल्या आहेत. भाजपने प्रभाग १७ मधून मनोज साबळे यांना उमेदवारी दिली आहे. मनोज साबळे हे काँग्रेसमधून भाजपमध्ये आले होते. त्यामुळे भाजपने ऐनवेळी तिकीट दिले. त्यामुळे अर्चना डेहनकर यांचे पती विनायक डेहनकर हे नाराज झाले. आपल्याला तिकीट मिळेल



असं त्यांना वाटत होतं. पण प्रत्यक्षात त्यांचं तिकीट कापलं गेलं.

तिकीट कापल्याने डेहनकर प्रचंड नाराज झाले. विनायक डेहनकर यांनी पक्षाच्या विरोधात बंडखोरी करत थेट अपक्ष उमेदवारी अर्ज भरला. त्यामुळे अर्चना डेहनकर या पक्षनिष्ठा आणि पतीचा निर्णय या कात्रीत सापडल्या. त्यामुळे अर्चना डेहनकर यांनी नवऱ्याचं घर सोडायचं ठरवलं आणि घराबाहेर पडल्या. त्यांनी नागपुरातच माहेरी जाऊन भाजपचा प्रचार करण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे डेहनकर आता नवऱ्याच्या विरोधातच प्रचार करताना दिसणार आहेत. २००९ ते २०१२ दरम्यान भाजपमुळे महापौरपद मिळाल्याने पक्षाच्या विरोधात जाणे अर्चना डेहनकरांना अमान्य असल्यानं त्यांनी नागपुरातील भावंच घर गाठलं आहे.

डेहनकर यांच्या बंडखोरीची नागपुरात चर्चा असतानाच आणखी एका बंडखोरीची चर्चा रंगली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे माजी स्वीय सहाय्यक आणि सघांचे एकनिष्ठ स्वयंसेवकाच्या मुलानेही बंडखोरी केली आहे.

**जाहिर प्रगटन**
फक्त 300 रुपयात
दैनिक महिला संवाद मध्ये छोट्या जाहिराती आणि पॅनल जाहिराती अगदी स्वस्तात छापून मिळतील.
जाहिर प्रगटन, पाहिजेत, जन्मतारीख बदल, नावात बदल, मालमत्ता हस्तांतरण, खरेदी-विक्री व स्वरूपाच्या यासहित छोट्या
जाहिराती केवळ 300 रुपयात प्रसिध्द केल्या जातील..
इच्छुकांनी आजच
या नंबरवर संपर्क साधावा.
9168567111

# नववर्षाच्या सुरुवातीलाच भरधाव इनोव्हानं तिघांना चिरडलं

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर कोल्हापुरातील तावडे हॉटेल परिसरात आज (१ जानेवारी) नववर्षाच्या सुरुवातीलाच पहाटेच्या सुमारास भीषण अपघात घडला. भरधाव वेगात असलेल्या इनोव्हा कारने रस्त्याकडेला उभ्या असलेल्या तिघांना जोरदार धडक दिल्याने तिघांचाही जागीच मृत्यू झाला. ही घटना पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, तावडे हॉटेल चौकात रस्त्याकडेला शेकोटी करून उभ्या असलेल्या तिघांवर अचानक काळाचा घाला आला.



भरधाव इनोवा कारने नियंत्रण सुटल्याने थेट तिघांना चिरडले. घटनेची माहिती मिळताच शाहूपुरी पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सीपीआर रुग्णालयात पाठवले आहेत. अपघातात ठार झालेल्या तिघांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. पुढील तपास शाहूपुरी पोलीस करत आहेत.

**कसबा बावड्यातील एकाचा सांगलीत मृत्यू**

दुसरीकडे, दोन दिवसांपूर्वी सोलापूरजिल्ह्यात देवदर्शन करून गावाकडे परतणाऱ्या कुटुंबाच्या कारला गुहागर-विजापूर मार्गावर खानापूरजवळ भीषण अपघात झाला. दोन कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले. हा अपघात सोमवारी सायंकाळी तामखडी परिसरात घडला. या अपघातात विश्वास शामराव चौगुले (वय ५९, सध्या रा. कऱ्हाड, जि. सातारा; मूळ रा. कसबा बावडा, कोल्हापूर) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्या पत्नी सुरेखा चौगुले आणि दोन मुले किरकोळ जखमी झाली आहेत.

मूळचे कसबा बावडा येथील रहिवासी असलेले विश्वास चौगुले हे व्यवसायाच्या निमित्ताने कुटुंबासह सध्या कऱ्हाड येथे वास्तव्यास होते. ते पत्नी, दोन मुले तसेच मित्र तानाजी जाधव (रा. वाठर, ता. कऱ्हाड) आणि लता विष्णू कुंभार (रा. वाठार) यांच्यासोबत देवदर्शनासाठी सोलापूर जिल्ह्यात गेले होते. परतीच्या प्रवासात तामखडी गावाजवळ त्यांच्या कारची समोरून येणाऱ्या दुसऱ्या कारशी जोरदार धडक झाली.

# संभाजीनगर भाजपमध्ये प्रचंड नाराजी सावेंच्या कार्यालयासमोर इच्छुकांचा आक्रोश

**छ.संभाजीनगर । विजया कांबळे**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीच्या तिकीट वाटपावरून भारतीय जनता पक्षातील अंतर्गत धुसफूस आता चव्हाट्यावर आली आहे. गेल्या १८ वर्षांपासून पक्षासाठी रक्त आटवणार्या आणि आंदोलनांमध्ये अंगावर १८ केसेस ओढवून घेणार्या निष्ठावंत कार्यकर्ती दिव्या उल्हास मराठे यांना पक्षाने डावलल्यामुळे त्यांनी मोठा संताप व्यक्त केला आहे.

प्रबळ उमेदवार असतानाही एका नवख्या उमेदवाराला संधी दिल्याचा आरोप करत दिव्या मराठे यांनी आता थेट प्रचार कार्यालयात धडक देत स्थानिक नेतृत्तवावर हल्ला चढवला. तर पक्षासाठी नोकरी सोडली. खस्ता खाल्ल्या. मात्र, ऐनवेळेस डावलले, असा आरोप करत अतुल सावे यांच्या कार्यालयासमोर आणखी एका इच्छुकाने रोष व्यक्त केला. शेवटी पोलिसांना त्यांना आवरावे लागले.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. दिव्या मराठे यांनी प्रभाग क्रमांक २० मधून 'खुल्या प्रवर्ग महिला' गटातून भाजपची उमेदवारी मागितली होती. मात्र, पक्षाने त्यांना डावलून एका अत्यंत कनिष्ठ कार्यकर्त्याच्या पत्नीला तिकीट दिले आहे. या निर्णयामुळे धक्का बसलेल्या दिव्या मराठे यांनी थेट मंत्री अतुल सावे आणि खासदार भागवत कराड यांना पक्षासाठी आम्ही लढलो, मग फळ दुसर्यालाच का?

आपल्या भावना व्यक्त करताना दिव्या मराठे यांना अश्रू अनावर झाले. त्या म्हणाल्या, मी गेल्या १८ वर्षांपासून भाजपचा झेंडा खांद्यावर घेऊन फिरतेय. पक्षाच्या कामासाठी माझ्यावर आज १८ केसेस आहेत. जेव्हा पक्षात कोणी नव्हते, तेव्हा आम्ही सोबत होतो. आज पक्ष मोठा झाला म्हणून बाहेरच्यांना आणि ज्यांनी कधी पक्षाचा प्रचारही केला नाही, अशांच्या पत्नीला तिकीट दिले जात आहे. एखाद्या आमदार किंवा खासदाराच्या पत्नीला तिकीट दिले असते, तर मी समजू शकले असते. पण ज्या बाईने कधी पक्षाचे कामच केले नाही, तिला कोणत्या आधारावर तिकीट दिले?

# महावितरणच्या ऑनलाईन सेवेमुळे ग्राहकांना सुविधा

## ५८ हजार ग्राहकांना नाव बदलाचा तर १० हजार ग्राहकांना भारवाढीचा लाभ

**छ.संभाजीनगर । विजया कांबळे**

वीज कनेक्शनच्या नावात बदलाच्या अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्याची सुविधा महावितरणने सुरू केल्यानंतर राज्यातील वीज ग्राहकांना त्याचा मोठा लाभ झाला असून दोन महिन्यात ५८,१६७ ग्राहकांनी घरबसल्या नावात बदल (चेंज ऑफ नेम) करून घेतला. त्याचसोबत वीज ग्राहकांना मंजूर भार वाढवून घेण्यासाठी सुरू केलेल्या सुविधेचा १०,४२८ ग्राहकांना लाभ झाला आहे.

जीवनसुलभतेसाठी (ईज ऑफ लिव्हिंग) महावितरणने वीज ग्राहकांना जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन द्याव्यात जेणेकरून वीज ग्राहकांना घरबसल्या सुविधांचा लाभ घेता येईल व त्यांना कार्यालयात जावे लागणार नाही, असा प्रयत्न चालू आहे. त्यानुसार महावितरणने वीज कनेक्शन नावात बदल आणि मंजूर भार बदल यासाठी ऑनलाईन व झटपट सुविधा उपलब्ध केली आहे.

खरेदी - विक्री, वारसा हक्क किंवा इतर कारणांमुळे घर किंवा इतर मालमत्तेच्या मालकीमध्ये बदल झाल्यानंतर वीजबिलाच्या ग्राहक नावात बदल करण्यासाठी अर्ज करण्यात येतो. या प्रक्रियेसाठी महावितरण मोबाईल ॲप अथवा ु.ारहरवळीलो.ळप या संकेतस्थळावर वीजग्राहकांना 'लॉग-इन'द्वारे ऑनलाइन अर्ज सादर करता येतो. ग्राहकाला कोणत्या कारणासाठी नाव बदलणे आवश्यक आहे त्याचा पर्याय निवडला की, त्यानुसार आवश्यक ते निवडक दाखले जोडावे लागतात. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर तीन ते सात दिवसात नावातील बदलाची प्रक्रिया पूर्ण होते.

महावितरणने लघुदाब वर्गवारीतील सर्व औद्योगिक, व्यावसायिक, घरगुती व इतर ग्राहकांच्या १५७ केडब्लूपर्यंत वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजुरी देण्यास प्रारंभ केला आहे. या सुविधेचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांची संख्या आता १०,४२८ झाली आहे व त्यांनी ६९.३७ मेगावॅट भार वाढवून घेतला आहे. अस्तित्वात असलेल्या जोडणीच्या वीजभारामध्ये (डेरव उहरपसश/ऊशारपव उहरपसश) वाढ करणे किंवा कमी करण्याची सोय महावितरणच्या ु.ारहरवळीलो.ळप संकेतस्थळावर किंवा मोबाइल ॲपवर ग्राहकांना उपलब्ध आहे.

वीज भार वाढीबाबत ऑनलाइन मागणी नोंदविल्यानतंर संबंधित ग्राहकांना स्वयंचलित पद्धतीने कोटेशन देण्यात येते. वीजग्राहकांनी आवश्यक शुल्काचा भरणा केल्यानंतर नवीन मीटर बसविण्याची किंवा पायाभूत वीजयंत्रणा उभारण्याची गरज नसेल अशा वीजजोडणीचा वाढीव वीज भार स्वयंचलित प्रणालीने मंजूर होतो व केवळ २४ तासांत कार्यान्वित होतो. वाढीव वीजभाराच्या आवश्यकतेनुसार किंवा सिंगलऐवजी थ्री फेजची मागणी असल्यास नवीन मीटर लावण्यात येतो. अशा ठिकाणी नवीन वीज मीटर लावण्याचा आदेश स्वयंचलितपणे संबंधित एजन्सीला देण्यात येतो. नवीन वीजमीटरची आवश्यकता असलेल्या ठिकाणी देखील साधारणतः ४८ तासांमध्ये वीज भार वाढीची प्रक्रिया पूर्ण होते.

लघुदाब वर्गवारीमध्ये वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजूरी देण्याच्या निर्णयामुळे प्रामुख्याने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसाठी घरगुती ग्राहकांना तसेच प्रामुख्याने औद्योगिक, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहकांना मोठा लाभ होत आहे.

## संपादकीय...

# महाराष्ट्रातील निवडणुका

महाराष्ट्रातील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. उमेदवार निवडीच्या प्रक्रियेत पक्षांची रणनीती, युती-आघाड्यांची गणिते आणि जिंकण्याच्या शक्यतेवर आधारित निर्णय हे सर्वस्वी अपेक्षितच आहेत. मात्र या प्रक्रियेत निष्ठावंत कार्यकर्ते पुन्हा एकदा दुर्लक्षित राहिल्याचं चित्र स्पष्टपणे दिसत आहे.

अनेक राजकीय पक्षांनी उमेदवार निवडताना वर्षानुवर्षे पक्षासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांऐवजी बाहेरून आलेल्या, आर्थिकदृष्ट्या सक्षम किंवा तात्कालिक समीकरणांमध्ये बसणाऱ्या व्यक्तींना प्राधान्य दिल्याचा आरोप कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. परिणामी, तळागाळात असंतोष वाढताना दिसतो आहे. ही नाराजी केवळ एका गटापुरती मर्यादित नाही. ग्रामीण भागांपासून शहरी मतदारसंघांपर्यंत, प्रत्येक स्तरावर कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता आहे. प्रचार, संघटन आणि जनसंपर्काची जबाबदारी वाहणाऱ्या या कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या वेळी दुय्यम स्थान दिलं जात असल्याची भावना तीव्र होत चालली आहे.

विशेषतः महिला कार्यकर्त्यांमध्ये असलेली नाराजी दुर्लक्षित करता येणार नाही. महिलांना संघटनात्मक कामात पुढे आणण्याच्या घोषणा दिल्या जात असल्या, तरी प्रत्यक्ष उमेदवारी देताना त्यांचा विचार पुरेसा होत नाही, असा आरोप सातत्याने होत आहे. प्रचारासाठी सक्रिय सहभाग अपेक्षित असतो, मात्र निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित राहतो, हे चित्र लोकशाही मूल्यांशी सुसंगत नाही.

निवडणूक ही केवळ विजय-पराभवाची लढाई नसून, ती पक्षाच्या संघटनात्मक आरोग्याचीही कसोटी असते. निष्ठावंत कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केल्यास त्याचा परिणाम तात्कालिक विजयावर कदाचित दिसणार नाही; मात्र दीर्घकालीन पातळीवर पक्षाच्या मुळांवर त्याचा परिणाम होतो, हे इतिहासाने वारंवार दाखवून दिलं आहे. आज महाराष्ट्राचं राजकारण अधिकाधिक व्यक्तिकेंद्रित आणि सत्ताकेंद्रित होत चाललं आहे. युतीधर्म, राजकीय तडजोडी आणि संधीसाधूपणा यामध्ये मूळ विचारधारा आणि कार्यकर्त्यांचा आत्मसन्मान हरवत चालला आहे. ही बाब केवळ पक्षांसाठीच नव्हे, तर राज्यातील लोकशाहीसाठीही चिंताजनक आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. कार्यकर्त्यांचा विश्वास, त्यांची निष्ठा आणि त्यांचा सहभाग हेच कोणत्याही पक्षाचं खऱ्या अर्थाने बळ असतं. त्याकडे दुर्लक्ष केल्यास, ही नाराजी निवडणुकीत आणि निवडणुकीनंतरही अधिक तीव्र स्वरूपात प्रकट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्रातील राजकारणाने आता हा इशारा गांभीर्याने घ्यायला हवा-कारण कार्यकर्त्यांचा आवाज दुर्लक्षित करणारी लोकशाही दीर्घकाळ टिकू शकत नाही.

**ज्योती आडेकर**
**संपादक**
**दै. महिला संवाद वर्तमानपत्र**

# कुछ घाव माफी की इजाजत नहीं देते

**ज्योती आडेकर**
संपादक
महिला संवाद वर्तमानपत्र

नवीन वर्ष दारात उभं आहे, मात्र अनेकांसाठी मन अजूनही मागील वर्षाच्या उंबरठ्यावरच थांबलेलं आहे. कारण काही जखमा अशा असतात ज्या काळासोबतही शांत होत नाहीत. त्या हळूहळू अधिक खोल जात राहतात आणि माणसाला आतून बदलून टाकतात.

मागच्या वर्षात अनेकांनी आपली अत्यंत जवळची माणसं कायमची गमावली. कायम - म्हणजे आता पुन्हा कधीच भेट होणार नाही, एकत्र हसणं होणार नाही, साधं कसं आहेस? असं विचारणारंही कोणी उरणार नाही. त्यांच्या आठवणी रोजच्या आयुष्यात पावलोपावली भेटत राहतात; मात्र ते स्वतः कधीच परत येणार नाहीत, ही जाणीव मनाला आतून पोखरत राहते.

मागील वर्षात घडलेल्या घटनांच्या जखमा अजूनही ताज्याच आहेत. त्या भरून याव्यात इतका वेळही मिळालेला नाही. त्यातच वेदनेत भर पडली ती विश्वासघाताची. ज्यांच्यावर सर्वाधिक विश्वास ठेवला, ज्यांच्यावर अतोनात प्रेम केलं, त्यांनीच आपली लायकी वागण्यातून दाखवली. शब्दांपेक्षा कृती अधिक बोलकी ठरली. अपेक्षा मोडल्या जाण्याचं दुःख जितकं तीव्र असतं, तितकंच ते माणसांवरील विश्वास हादरवणारंही असतं. मागच्या वर्षाने खूप काही शिकवलं. सगळ्यात मोठा धडा म्हणजे - माणसं ओळखता आली पाहिजेत. गोड बोलणाऱ्यांपेक्षा कठीण काळात सोबत उभे राहणाऱ्यांवर विश्वास ठेवायला हवा, हे उमगायला वेळ लागला; आणि त्याची किंमतही मोठी मोजावी लागली. नवीन वर्ष म्हणजे सगळं विसरण्याची सक्ती नव्हे. सगळ्यांना माफ करण्याचं ओझंही नव्हे. काही घाव माफीची इजाजतच देत नाहीत - ते केवळ अधिक सजग, सावध आणि शहाणं बनवतात. या पार्श्वभूमीवर निसर्गदेवतेकडे एकच कळकळीची विनंती आहे - या वर्षात दगा देणारी माणसं आयुष्यातून दूर ठेव. जे मनात गोड आणि कृतीत विष ठेवतात, जे प्रेमाच्या नावाखाली फसवतात, जे विश्वासाचा गैरफायदा घेतात - अशा लोकांपासून संरक्षण मिळो.

या नवीन वर्षात वेदना कमी होतीलच असं नाही, पण शहाणपण नक्की वाढो. आठवणी राहोत, मात्र त्या मोडून टाकणाऱ्या न ठरता बळ देणाऱ्या ठराव्यात. हरवलेली माणसं परत येणार नाहीत, हे वास्तव स्वीकारण्याचं धैर्य मिळो; आणि जे आज सोबत आहेत, जे प्रामाणिक आहेत, त्यांना जपण्याची समजही मिळो.

नवीन वर्ष म्हणजे नव्या स्वप्नांची केवळ सुरुवात नाही, तर तुटलेल्या मनानेही पुन्हा उभं राहण्याचा प्रयत्न आहे. जखमा असतील, अश्रू असतील; पण तरीही आशा जिवंत ठेवणं हाच खरा विजय आहे. या नवीन वर्षात शांतता, सत्य आणि स्वतःसाठी थोडी तरी सुरक्षितता लाभो - हीच मनापासूनची शुभेच्छा.

## भाडेकरूनेच गळा आवळून वृद्ध महिलेची केली हत्या

**हैदराबाद । वृत्तसेवा**

हैदराबाद येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. भाडेकरूनेच आपल्या वृद्ध घर मालकीणीची हत्या केल्याचे समोर आले आहे. आरोपी भाडेकरू हा कॅब ड्रॉयव्हर होता. त्याने आपल्या ६५ वर्षीय घरमालकिणीची केवळ सोन्याच्या दागिन्यांसाठी निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. त्याने मृतदेहाची व्हिलेवाट लावण्यासाठी मृतदेह चक्क शेजारच्या राज्यातील गोदावरी नदीत फेकून दिला होता. हत्या झालेल्या महिलेचे नाव सुजाता (६५) असे आहे.

मल्लापूर येथील बाबा नगरमध्ये पीडित महिला सुजाता राहत होत्या. सुजाता यांचे पती आणि मुलांचे आधीच निधन झाले होते. त्या घरात एकट्याच राहत होत्या. दोन महिन्यापूर्वी आंध्र प्रदेशातील कोनासीमा जिल्ह्यातील अंजीबाबू (३३) या कॅब ड्रायव्हरला त्यांच्या घराचा एक भाग भाड्याने दिला होता. सुजाता एकट्या आहेत आणि त्यांच्याकडे भरपूर सोने




आहे हे पाहून अंजीबाबुच्या मनात त्यांना लुटण्याचा विचार आला. त्याने लुटण्याचा कट रचला.

१९ डिसेंबरच्या रात्री अंजीबाबुने सुजाता यांच्या घरात घुसून त्यांची गळा आवळून हत्या केली. त्यांच्या अंगावरील सुमारे ११ तोळे सोन्याचे दागिने लुटल्यानंतर त्याने घराला बाहेरून कुलूप लावले आणि आपल्या मूळ गावी पळ काढला. त्याने त्याचा मित्र युवराजू (१८) आणि दुर्गाराव (३५) यांना या गुन्ह्याची माहिती दिली.

२० डिसेंबरला हे तिन्ही आरोपी कार भाड्याने घेऊन पुन्हा हैदराबादला आले. त्यांनी सुजाता यांचा मृतदेह एका सुटकेसमध्ये भरला आणि कारमधून आंध्र प्रदेशातील कोनासीमा जिल्ह्यात नेला. तिथे असलेला वैनतेय गोदावरी नदीच्या पात्रात त्यांनी मृतदेह फेकून दिला. आरोपींना वाटले की मृतदेह वाहून जाईल आणि कधीच पकडले जाणार नाही.

सुजाता यांची बहीण सुवर्णलता यांनी जेव्हा घरी भेट दिली, तेव्हा घराला कुलूप त्यांना दिसला. सुजाता यांचा फोन लागत नव्हता. त्यांनी २४ डिसेंबर रोजी नाचराम पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी तपास केला तेव्हा भाडेकरू अंजीबाबू बेपत्ता असल्याचे समोर आले.संशयावरून पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे अंजीबाबूला ताब्यात घेतले.

सुरुवातीला उडवाउडवीची अंजीबाबूने उत्तरे दिले. मात्र पोलीस खाक्या दाखवताच गुन्ह्याची कबुली त्यांनी दिली. पोलिसांनी तात्काळ अंधार प्रदेश गाठले. आरोपीने दाखवलेल्या जागेवरून नदीच्या पात्रातून मंगळवारी सकाळी सुजाता यांचा मृतदे बाहेर काढण्यात आला. त्यांच्याकडून लुटलेले सोनेही ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी त्याच्या दोन साथीदारांना देखील केली.

## रेवदंडा बंदर खाडी जेट्टीवर अज्ञात वृद्ध महिलेची संकटमय मृतदेह सापडला

**रायगड । प्रतिनिधी**

रेवदंडा मोठ्या बंदर खाडीच्या जेट्टीवर आज अज्ञात वृद्ध महिलेचा मृतदेह सापडल्याची घटना घडली. स्थानिक नागरिकांनी सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास ही माहिती रेवदंडा पोलीसांना दिली. तात्काळ घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी प्राथमिक तपास केला असता, महिलेची ओळख पटवण्यात यश आले नाही. मृतदेह रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आला, मात्र तेथे पोस्टमार्टमची सोय नसल्याने अलिबाग सिव्हिल हॉस्पिटलला शववाहिनीत घेऊन जावले.महिलेच्या वयाबाबत अंदाजे ६० ते ७० वर्षे असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

तिच्या कपड्यांवरून ती स्थानिकच असावी असा संशय आहे, तरीही कोणतीही ओळखपत्रे किंवा वैशिष्ट्यपूर्ण वस्तू सापडली नाहीत. जेट्टी परिसरातील मच्छीमार आणि पर्यटकांमधून ही घटना चर्चेत आली असून, काहींनी ती विहंगावत किंवा नैसर्गिक मृत्यू असावा असे सांगितले. मात्र, पोलिसांनी अनधिकृतरीत्या खाडीत बुडून मृत्यू किंवा इतर संशयास्पद कारण असण्याची शक्यता नाकारली नाही. पोस्टमार्टम अहवालानंतरच मृत्यूकारण स्पष्ट होईलअलिबाग सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पोस्टमार्टम प्रक्रिया पार पडेल, ज्याचा अहवाल मिळाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण समोर येईल. रेवदंडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक (नाव) यांनी सांगितले की, घटनास्थळाचा सखोल तपास सुरू आहे. मृतदेह सापडलेल्या ठिकाणी कोणतेही हिंसाचाराचे पुरावे आढळले नाहीत, तरी सर्व पैलू तपासले जात आहेत. स्थानिकांना माहिती असल्यास पुढे येण्याचे आवाहन करतो.

पोलिसांनी खाडी किनारपट्टीवरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, मृत महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी परिसरातील दवाखाने, आश्रम आणि स्थानिक संस्थांशी संपर्क साधला आहे.स्थानिक प्रशासनाची तात्काळ कारवाई रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. धरणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात महिलेच्या शरीरावर जखम किंवा बाह्य चोटीचे कोणतेही लक्षण दिसले नाही. मात्र, पोस्टमार्टम आवश्यक असल्याने अलिबागेत हलवण्यात आले. या घटनेमुळे रेवदंडा-मुरुड पर्यटन क्षेत्रातील सुरक्षेच्या मुद्द्यांवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.


स्थानिक मच्छीमार संघटनेने जेट्टी परिसरात नियमित गस्त वाढवण्याची मागणी केली आहे. पुढील तपास रेवदंडा पोलीस करत असून, नवीन माहिती मिळाल्यास कळवण्यात येईल.

## मुंबईत पावसाने केलं नववर्षाचं स्वागत, ऐन थंडीत पावसाची जोरदार बॅटिंग

**मुंबई । प्रतिनिधी**

थाटात २०२६ या नववर्षाच स्वागत केलं. मात्र नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी मुंबईमध्ये जोरदार पावसान हजेरी लावली आहे. सीएसएमटीसह दादर परिररात जोरदार पावसाची बॅटिंग सुरू होती. अचानक आलेल्या या पावसामुळे नागिरकांची मात्र मोठी तारांबळ उडाल्याचे पहाला मिळालं. नव वर्षाच्या पहिल्याच दिवशी गुरूवारी पहाटे मुंबईत जोरदार पावसाचे आगमन झाले. न्यू ईअर सेलिब्रिशेन करून अनेक जण मध्यरात्री घरी निवांत झोपले, तर काही उत्साही वीर पहाटेपर्यंत पार्टी करत होते. मात्र तेवढ्यात पहाटे पहाटेच ऐन थंडीत पावसाचे आगमन झाले आणि जोरदार पाऊस कोसळू लागली.

सरत्या वर्षाला निरोप देऊन सर्वांनीच थाटात २०२६ या नववर्षाच स्वागत केलं. मात्र नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी मुंबईमध्ये जोरदार पावसान हजेरी लावली आहे. सीएसएमटीसह दादर परिररात जोरदार पावसाची बॅटिंग सुरू होती. अचानक



आलेल्या या पावसामुळे नागिरकांची मात्र मोठी तारांबळ उडाल्याचे पहाला मिळालं. नव वर्षाच्या पहिल्याच दिवशी गुरूवारी पहाटे मुंबईत जोरदार पावसाचे आगमन झाले. न्यू ईअर सेलिब्रिशेन करून अनेक जण मध्यरात्री घरी निवांत झोपले, तर काही उत्साही वीर पहाटेपर्यंत पार्टी करत होते. मात्र तेवढ्यात पहाटे पहाटेच ऐन थंडीत पावसाचे आगमन झाले आणि जोरदार पाऊस कोसळू लागली.


गेल्या काही दिवसांत राज्यातील अनेक भागांमध्ये किमान तापमानात लक्षणीय घट झाली असून काही ठिकाणी तर तापमानाचा पार १० अंशांच्याही खाली गेल्याचं दिसलं. थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला नसला तरी पहाटे आणि रात्रीनंतर गारवा वाढत चालला आहे. मुंबई, कोकण आणि किनारी भागांमध्ये रात्री व पहाटे थंड वारे वाहत असून थंडीची चाहूल कायम आहे. त्यामुळे नागरिक ठिकठिकाणी शेकोट्या वगैरे पेटवून ऊब मिळवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. असं असलं तरी सूर्य डोक्यावर आल्यावर दुपारी वातावरणातील उष्मा वाढत आहे, त्यामुळे दिवसा व रात्रीच्या तापमानात जमीन-अस्मानाचा फरक दिसून येत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवस उत्तर महाराष्ट्रात थंडीचा प्रभाव चांगलाच जाणवणार आहे. तिथे तापमान एक अंकी म्हणजे ७ ते ८ अंशांच्या दरम्यान राहू शकतं. तसेच मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांसाठी पुढील चार दिवस थंडी कायम राहण्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. वाढतं धुकं दाट होत असल्याने नागरिकांनी वाहन चालवताना काळजी घ्यावी असे आवाहनही करण्यात आले आहे.

## कल्याण-डोंबिवलीकरांनो सावधान, AQI पोहोचला डेंजर झोनमध्ये

**मुंबई । प्रतिनिधी**

देशभरात सर्वत्र सरत्या वर्षाला निरोप देऊन २०२६ या नवीन वर्षाचे जोरदार स्वागत करण्यात आले. एकीकडे नववर्षाचे स्वागत होत असतानाच कल्याण-डोंबिवलीत मात्र निसर्गाचा लहरीपणा पाहायला मिळत आहे. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी हवामानात कमालीची तफावत जाणवत आहे. कल्याण डोंबिवलीतील नागरिकांना एकाच वेळी थंडी आणि उन्हाच्या झळांचा सामना करावा लागत आहे. त्यातच फटाक्यांची आतषबाजी आणि वाहनांच्या धुरामुळे हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक (-टख) खालावल्याने चिंतेत भर पडली आहे.

आज पहाटेपासून शहरात काहीसा गारठा जाणवत होता. मात्र काही वेळातच हे चित्र वेगाने बदलले. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, आज कल्याण-डोंबिवलीचे किमान



तापमान २९ओउ इतके उच्चांकी नोंदवण्यात आले आहे, तर कमाल तापमान ३० ते ३३ओउ दरम्यान राहण्याची शक्यता आहे. हिवाळ्याच्या दिवसातही दुपारी उन्हाच्या तीव्र झळा बसत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

विशेष म्हणजे कल्याण डोंबिवलीत हवेची गुणवत्ता ढासळली आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी शहरात ठिकठिकाणी झालेली फटाक्यांची आतषबाजी आणि पर्यटनासाठी बाहेर पडलेल्या वाहनांच्या धुरामुळे हवेचे प्रदूषण वाढले आहे. कल्याणमध्ये हवेचा गुणवत्ता निर्देशांक (-टख) १०९ ते ११६ च्या दरम्यान नोंदवला गेला आहे. तर डोंबिवलीत -टख ९० ते ११० च्या दरम्यान आहे. हा निर्देशांक 'मध्यम' ते 'वाईट' श्रेणीत मोडत असून, यामुळे हवेतील धुलीकणांचे प्रमाण वाढले आहे. शहरावर प्रदूषणाची एक धुरकट चादर पसरल्याचे चित्र सकाळी पाहायला मिळाले.

हवेतील वाढते प्रदूषण आणि तापमानातील चढ-उतार यामुळे श्वसनाचे विकार असलेल्या रुग्णांना त्रास होऊ शकतो. विशेषतः १. ज्येष्ठ नागरिकांना श्वसनास त्रास होणे किंवा दम लागण्याचे प्रमाण वाढू शकते. तसेच लहान मुलांना खोकला आणि घशाचे संसर्ग होण्याची शक्यता आहे. त्यासोतबच अस्थमा किंवा ब्रॉन्कायटिस असलेल्या रुग्णांनी घराबाहेर पडताना मास्कचा वापर करावा आणि या काळात भरपूर पाणी पिण्याचे आणि शक्यतो दुपारच्या वेळी थेट उन्हात जाणे टाळण्याचे आवाहन डॉक्टरांनी केले आहे.

दरम्यान हवामानातील हा लहरीपणा आणि ढासळलेली हवेची गुणवत्ता पाहता आगामी काही दिवस कल्याण-डोंबिवलीकरांसाठी आरोग्याच्या दृष्टीने आव्हानात्मक ठरू शकतात. निसर्गाच्या या बदलत्या रुपामुळे नागरिकांनी सतर्क राहणे गरजेचे आहे. प्रशासनाकडूनही प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी काय पावले उचलली जातात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. तोपर्यंत आरोग्याची काळजी घेणे हाच सर्वोत्तम उपाय असल्याचे दिसून येत आहे.

# नवीन वर्षाचा पहिलाच दिवस लाडक्या बहिणींसाठी ठरला सर्वात मोठा

**मुंबई । प्रतिनिधी**

जुनं वर्ष सरून २०२६ चं नववर्ष उजाडलं असून या नव वर्षात राज्यातील लाडक्या बहीणींसाठी एक मोठी अपडेट आली आहे. लाडक्या बहिणींना मिळणारे १५०० रुपये गेल्या दोन महिन्यांपासून खात्यात जमा झाले नव्हते. मात्र आता याचसंदर्भात मोठी माहिती समोर आली आहे. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या' लाभार्थी महिलांना पैसे मिळण्यास सुरूवात झाली असून त्यांच्या खात्यात एका महिन्याचा हप्ता, म्हणजेच १५०० रुपये जमा झाले आहेत. ज्या लाभार्थी महिलांनी ई-केवायसीची (ए-घूल) प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांच्या खात्यात हे पैसे जमा झाले आहेत.

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी खात्यात पैसे मिळाल्याने लाडक्या बहिणींसाठी ही आनंदाची बातमी आहे. तुम्ही लाभार्थी असाल तर हे पैसे जमा झालेत की नाही ते ऑनसलाइनही चेक करू शकता. मात्र असे असले तरी डिसेंबर आणि जानेवारीचे पैसे कधी मिलमार असा सवाल अनेकींच्या मनात आहे.

गेल्या दीड वर्षांपासून राज्यातील सुमारे २ कोटी महिला या लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत आहेत. राज्यसरकारने जाहीर केलेल्या या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात दर महीना १५०० रुपये जमा होता. मात्र ऑक्टोबरमध्ये पैसे मिळाल्यानंतर नोव्हेंबर सरला, डिसेंबर संपला तरी लाडक्या बहिणींना पैसे मिळाले नव्हते.

त्यांना नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी असे तीन महिन्याचे एकत्र ४५०० रुपये मिळतील अशाही बातम्या समोर येत होत्या, मात्र हे पैसे खात्यात कधी जमा होणार याची काही अधिकृत माहिती समोर आली नव्हती.

मात्र अखेर कालपासून (३१ डिसेंबर) लाभार्थी महिलांच्या खात्यात एक महिन्याचे पैसे (१५०० रुपये) जमा झाले असून अनेकींना याचा लाभ मिळाला आहे. ज्या महिलांनी ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण केली त्यांच्याच खात्यात १५०० रुपये जमा झाले आहेत. मात्र हे एकाच महिन्याचे पैसे असून डिसेंबरचे आणि आज सुरू झालेल्या जानेवारी महिन्याचे पैसे




लाडक्या बहिणींना कधी मिळतील हे काही स्पष्ट झालेलं नाही. लाडकी बहीण योजनेत महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले की नाही हे तुम्ही ऑनलाइन तपासू शकता. तुमचं ज्या बँकेत अकाऊंट आहे, त्या बँकेच्या अधिकृत पवर जाऊन बॅलेन्स चेक करून पैसे आलेत की नाही हे समजू शकतं.

दरम्यान लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी ई-केवायसी बंधनकारक करण्यात आलं होतं. त्याची मुदत काल ( ३१ डिसेंबर)पर्यंतच होती. . खरंतर नोव्हेंबरपर्यंतच ई-केवायसीची मुदत होती, मात्र लाखो महिलांचे ई-केवायसी न झाल्याने ही मुदत वाढवण्यात आली होती.

लाडकी बहीण योजनेतील बोगस लाभार्थी वगळण्यासाठी महिला व बालविकास विभागाकडून ईकेवायसी बंधनकारक करण्यात आले होते. आधी ईकेवायसीची मुदत १८ नोव्हेंबरपर्यंत होती, मग ती वाढवून ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. पण त्यानंतरही अनेक महिलांना ई-केवायसी करण्याच अडचणी आल्याने ही मुदत वर्षाअखेरीस, ३१ डिसेंबपर्यंत वाढवण्यात आली.

काल अखेर ही मुदत संपली. त्यामुळे आता ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे, त्यानंच या योजनेचा लाभ आणि पर्यायाने दरमहा १५०० रुपये मिळणार आहेत. उर्वरित महिलांना या योजनेला मुकावे लागू शकते.

## थोडक्यात

### केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांचा तीन दिवसांचा महाराष्ट्र दौरा

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान हे ३१ डिसेंबर २०२५ ते २ जानेवारी २०२६ या कालावधीत अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यांच्या दौऱ्यावर येत आहेत. हा दौरा शेतकरी, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि युवकांसाठी नव्या संधी यांना समर्पित असून, विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या शेतकरी व ग्रामीण विकासाच्या धोरणांची माहिती ते देणार आहेत. ३१ डिसेंबर रोजी श्री. चौहान अहिल्यानगर येथे विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. या दरम्यान ते बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्रास भेट देऊन शेतकरी गटांशी संवाद साधणार आहेत. तसेच शेतकरी व ग्रामीण विकासाशी संबंधित प्रश्नांवर चर्चा करून आढावा घेणार आहेत. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधताना ते पीक पद्धती, सिंचन, जलसंधारण, पीक विमा, बाजारपेठेपर्यंत पोहोच वाढविण्यासाठी तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीबाबत विचारमंथन करणार आहेत.
अहिल्यानगर दौऱ्यात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, नैसर्गिक शेती, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पीक विविधीकरण, मूल्यवर्धन तसेच शेतकरी उत्पादक संघटना (एफपीओ) यांच्या माध्यमातून संघटित शेतीला चालना देण्याबाबत आपली भूमिका यावेळी मांडतील.

१ जानेवारी २०२६ रोजी श्री. चौहान वृक्षारोपण करून शिर्डी येथील साईबाबा मंदिरात दर्शन घेणार आहेत. सकाळी १० ते ११ या वेळेत नववर्षाच्या निमित्ताने ते आपल्या दोन्ही मंत्रालयांतील अधिकाऱ्यांना दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करून विशेष संकल्प देणार असून आगामी वर्षातील कामकाजासाठी दिशा-निर्देश देतील. दुपारी २ वाजता ते शिर्डी जवळील लोणी बुद्रक येथे आयोजित ग्रामसभेत सहभागी होऊन ग्रामस्थ, मजूर व श्रमिक बांधवांशी संवाद साधणार आहेत. तसेच सायंकाळी ते शनी शिंगणापूर येथे दर्शन घेणार आहेत. २ जानेवारी रोजी नाशिक येथे श्री. चौहान यांचा कृषी विज्ञान केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ येथे मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दुपारी १२.१५ वाजता सुरू होणाऱ्या या कार्यक्रमात कुलगुरू व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सौजन्य भेटीनंतर सभागृहात औपचारिक उद्घाटन होणार आहे. यावेळी ते मार्गदर्शन करणार असून, प्रश्नोत्तर व संवादात्मक सत्राद्वारे विद्यार्थी व संशोधकांशी थेट संवाद साधणार आहेत.

### महाराष्ट्रासाठी विकासाच्या नव्या संधी घेऊन येईल -उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांच्या सक्रिय सहभागातून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरासह दूरदर्शी नियोजनाच्या माध्यमातून 'विकसित महाराष्ट्र' साकारण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली जात आहेत. त्यामुळे 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय उद्दिष्टपूर्तीत महाराष्ट्र आपली महत्त्वपूर्ण भूमिका यशस्वीपणे बजावेल, असा दृढ विश्वास व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील जनतेला नववर्ष २०२६च्या मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. येणारं नवीन वर्ष महाराष्ट्राला सर्वांगीण प्रगतीच्या मार्गावर अधिक वेगाने घेऊन जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणतात की, महाराष्ट्रवासियांच्या एकजूट आणि निर्धाराच्या बळावर राज्याने आतापर्यंत प्रत्येक आव्हानावर यशस्वीपणे मात केली आहे. ही एकजूट कायम ठेवत विकासाची वाटचाल अधिक भक्कम करण्याचा शासनाचा ठाम संकल्प आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पपूर्तीत महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, त्याअनुषंगाने राज्याची अर्थव्यवस्था २०२८ पर्यंत एक ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचं ध्येय निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास हाच शासनाचा एकमेव अजेंडा असून, त्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधा उभारणी, लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच शहरी व ग्रामीण भागाचा समतोल विकास साधण्यावर भर दिला जात आहे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून माहे डिसेंबर २०२५ अखेर अधिकारी, कर्मचारी असे एकूण २७ जण सेवानिवृत्त

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी महापालिकेच्या कार्यकाळात प्रामाणिकपणे व जबाबदारीने बजावलेली सेवा ही संस्थेच्या कार्यक्षमतेसाठी मोलाची ठरली असल्याचे प्रतिपादन उप आयुक्त संदीप खोत यांनी केले तसेच सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य आरोग्यदायी,आनंदी व समाधानकारक जावे अशा शुभेच्छा देखील त्यांनी दिल्या आणि पुढील जीवनप्रवासात नवे उपक्रम व सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा असे मत व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत मधुकर पवळे सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात माहे डिसेंबर २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या २२ तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या ५ अशा एकूण २७ कर्मचाऱ्यांचा उप आयुक्त यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यावेळी शुभेच्छा देताना ते बोलत होते.



या कार्यक्रमास मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कर्मचारी महासंघाचे बबन झिंजुर्डे तसेच मुख्य लिपिक उमेश बांदल,माया वाकडे आणि महापालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचाऱ्यांमध्ये प्रशासन अधिकारी ज्ञानेश्वर ढवळे, मुख्याध्यापिका शामला शिंदे,

लेखापाल चंद्रकला फुलसुंगे, सिस्टर इन्चार्ज अनिता लोंढे, जयश्री फाळके, प्रयोगशाळा सहाय्यक सुधाकर रासकर, कनिष्ठ अभियंता सतिश तायडे, वीजतंत्री भास्कर नेटके, वाहनचालक शंकर शिंगाडे, मनोज माछरे, मजुर ज्ञानेश्वर काळभोर, राजू भुजबळ, शहाजी बोत्रे, विलास माने, रखवालदार बाबुराव कायंदे, मुकादम जयश्री गडदे, स्प्रे कुली अरूण राक्षे, सफाई कामगार मुक्ताबाई लष्करे, रमा बाराथे, सफाई सेवक गीता तांबोळी, राजू बारसे, गटरकुली राजेश खरात यांचा समावेश आहे.

तर स्वेछानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये मजूर दिनकर देवाचे, सफाई कामगार पांडुरंग काकडे, संजय भोंडवे, सोपान लोहकरे, गोदावरी मोरे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

## थंडीत माणुसकीची ऊब; कवलीत ७०० उबदार ब्लँकेट व हरिपाठ पुस्तकांचे वाटप




**सोयगाव । विजया कांबळे**

वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर 'मानव सेवा हीच ईश्वर सेवा' या भावनेतून मराठा प्रतिष्ठानच्या वतीने तालुक्यातील कवली गावात गरजू नागरिकांसाठी उबदार ब्लँकेट व हरिपाठ पुस्तकांचे वाटप करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष सोपान गव्हांडे यांच्या नेतृत्वाखाली ( दि. २७ ) रोजी सायंकाळी सात वाजता हा उपक्रम राबविण्यात आला.

या वेळी कवली गावातील सुमारे ७०० गरजू नागरिकांना उबदार ब्लँकेट देण्यात आले, तसेच घरोघरी ५०० हरिपाठ पुस्तके वितरित करण्यात आली. थंडीत गरिबांच्या आयुष्यात माणुसकीची ऊब निर्माण करणारा हा उपक्रम उपस्थितांनी कौतुकास्पद ठरविला. कार्यक्रमास सायबर सेल (मुंबई) उपनिरीक्षक निवृत्ती बावसकर, माजी उपसभापती चंद्रकांत पाटील, उत्तम बावसकर, मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे, तालुकाध्यक्ष विजय चौधरी, सरपंच वसंत बनकर, सरपंच गणेश माळी, सुरेखा तायडे, पोलीस पाटील रवींद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.


या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी निवृत्ती केंडे, विनोद बावसकर, ज्ञानेश्वर गवळी, बंडू बावसकर, प्रमोद वाघ, एकनाथ गवळी, गणेश तायडे, अनिल गव्हांडे, अमोल बावसकर, भैया बावसकर, ज्ञानेश्वर युवरे, नवल बावसकर, कृष्णा धुमाळ, मंगेश पाटील, भुजंग पाटील, भीमराव पाटील, अमोल पाटील, अमोल बोरसे, नारायण बावसकर, शंकर पाटील, सचिन महाजन आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## पुणे साखळी बॉम्बस्फोटातील आरोपीची हत्या

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील २०१२ च्या प्रसिद्ध जे.एम. रोड साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपीची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे. अस्लम शब्बीर जहागीरदार उर्फ बंटी जहागीरदार असे या आरोपीचे नाव आहे. एका नातेवाईकाच्या अंत्यविधीहून घरी परतत असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर बेछूट गोळीबार केला. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या हत्येनंतर दोन्ही आरोपींनी स्वतःहून पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. या घटनेमुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बंटी जहागीरदार हा बुधवारी दुपारी आपल्या एका नातेवाईकाला श्रद्धांजली वाहण्यासाठी स्मशानभूमीत गेला होता. तेथून तो स्कूटरवरुन घरी परतत असताना, जर्मन हॉस्पिटलच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ दोन अज्ञात दुचाकीस्वारांनी त्याला गाठले. हल्लेखोरांनी अत्यंत जवळून जहागीरदारवर तीन गोळ्या झाडल्या. यातील दोन गोळ्या त्याच्या छातीत आणि पोटात लागल्याने तो जागीच कोसळला. रक्ताच्या



थारोळ्यात पडलेल्या जहागीरदारला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

गोळीबाराची ही थरारक घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या हत्येनंतर श्रीरामपूर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली होती. मात्र, अटकेच्या भीतीने दोन्ही संशयित आरोपींनी रात्री उशिरा शिर्डी पोलिसांसमोर स्वतः हून आत्मसमर्पण केले. या हत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, जुन्या वैमनस्यातून हा प्रकार घडल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

दरम्यान १ ऑगस्ट २०१२ रोजी पुण्याच्या जंगली महाराज रस्त्यावर झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांनी संपूर्ण देश हादरला होता. या स्फोटातील संशयितांना शस्त्रे पुरवल्याच्या आरोपाखाली जानेवारी २०१३ मध्ये दहशतवाद विरोधी पथकाने (-ढड) बंटी जहागीरदारला अटक केली होती. तो २०२३ पासून जामिनावर बाहेर होता. त्याच्यावर १९९७ पासून आतापर्यंत तब्बल १७ गंभीर गुन्हे दाखल आहेत. बंटी जहागीरदारचे कुटुंब स्थानिक राजकारणातही सक्रिय आहे. त्याची आई श्रीरामपूर नगरपरिषदेची माजी सदस्य होती. तर त्याचे चुलत भाऊ रईस शेख जहागीरदार हे सध्या नगरसेवक म्हणून कार्यरत आहेत.


या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नाशिक परिक्षेत्राचे महानिरीक्षक दत्तात्रेय कराळे यांनी तातडीने श्रीरामपूर गाठून घटनास्थळाची पाहणी केली. श्रीरामपूरचे पोलीस उपअधीक्षक जयदत्त भवर यांनी सांगितले की, आरोपींना ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू असून, चौकशीनंतर हत्येमागचा मुख्य सूत्रधार आणि कारण स्पष्ट होईल. खबरदारीचा उपाय म्हणून जहागीरदारचा मृतदेह शवविच्छेदनासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

## दारूच्या नशेत घरात घुसून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**लातूर । प्रतिनिधी**

लातूरच्या निलंगा शहरात एक धक्कदायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका ऑटो चालकाने दारूच्या नशेत एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कदायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना लातुरातील निलंगा शहरातील पारधी वस्तीत घडली आहे. पोलिसांनी आरोपी रिक्षा चालकाला अटक केली आहे.आरोपीच नाव योगेश खोमणे असा आहे. पीडित मुलगी घरात एकटी असतांना नशेत पीडितेच्या घरात घुसला होता. नराधमाने पीडितेवर जबरदस्ती करत अत्याचार केला. नंतर तिला रिक्षात टाकून पळवून नेले. याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांनी तपासाला सुरुवात केली.

पोलिसांनी आरोपीला शोध घेत मध्यरात्री पेठ परिसरातून आरोपी योगेश खोमणे याला पोलिसांनी ताब्यात



घेतले आहे. याप्रकरणी आता निलंगा पोलीस ठाण्यात बलात्कार, अपहरण अॅट्रॉसिटीसह पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास निलंगा पोलीस करताना दिसत आहेत.

लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील शिरूर ताजबंद येथून एक धक्कदायक घटना समोर आली आहे. ३६ वर्षीय तरुणाचा त्याच्याच पत्नीने डोके भिंतीवर आपटून आणि गळा आवळून हत्या केल्याचे समोर आले आहे. सुरुवातीला हा अपघात असल्याचा बनाव करण्यात आला. मात्र पोलिसांनी हा अपघात नसून हत्या असल्याचा उघड केला. मृतकाचे नाव प्रशांत असे आहे तर आरोपी पत्नीचा नाव अर्चना असे आहे.

प्रशांत आणि त्याची पत्नी अर्चना यांच्यात गेल्या काही काळापासून कौटुंबिक वाद सुरु होते. याच वादातून अर्चना दीड वर्ष माहेरी राहिली होती. पाच महिन्यांपूर्वीच ती पुन्हा सासरी नांदायला आली होती. १७ डिसेंबररोजी सायंकाळी अर्चनाने मागील भांडणाची कुरापत काढून तिने प्रशांत दारूच्या नशेत असताना भांडण काढले.

त्यावेळी तिने त्यांचे डोके भिंतीवर आपटले. नंतरदोरीने गळा आवळून त्यांचा खून केला. त्यानंतर तिने पती बेशुद्ध पडला आहे असा बनाव रचून दीर प्रवीण गायकवाड याला घरी बोलावले. प्रशांतला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## ऐतिहासिक विजयस्तंभास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिवादन

**पुणे । प्रतिनिधी**

२०८ व्या शौर्यदिनानिमित्त उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज सकाळी पेरणेफाटा येथील ऐतिहासिक विजयस्तंभास अभिवादन केले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे महासंचालक सुनील वारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे राज्य शासनाच्यावतीने विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी उपस्थित असून, हे अभिवादन राज्यातील नागरिकांच्यावतीने करण्यात येत आहे. विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या आयोजनासाठी राज्याचे मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा प्रशासनाने केलेल्या उत्तम नियोजनाबद्दल उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी समाधान व्यक्त केले. अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांची मोठी गर्दी लक्षात घेऊन राज्य शासनामार्फत योग्य ती काळजी घेण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## मुंबई-गोवा हायवेवर दरोड्याचा प्रयत्न; कुडाळमध्ये थरार

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर कुडाळजवळ मंगळवारी पहाटे थरारक घटना घडली. ब्लू डार्ट सर्विसचे कुरिअर वाहन (कंटेनर) लुटण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने महामार्गावर एकच खळबळ उडाली. या प्रकरणी कुडाळ पोलिस ठाण्यात सहा संशयितांविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपासाला वेग दिला आहे.

ही घटना मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास पणदूर परिसरात घडली. कंटेनर चालक मनोज कुमार पाल एस. ओपन बैचेनलाल (वय ३१, रा. मिर्जापूर, उत्तर प्रदेश) यांनी याबाबत कुडाळ पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार, मुंबई-गोवा महामार्गावरून कंटेनर घेऊन जात असताना एका बलेनो कारमधून




आलेल्या संशयित आरोपीनी कंटेनरचा पाठलाग सुरू केला.

लुटीच्या उद्देशाने कुरिअर वाहन अडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र चालकाने प्रसंगावधान राखत वाहन न थांबवता पुढे नेले, त्यामुळे संतप्त झालेल्या संशयितानी कंटेनरवर दगडफेक केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी सुजल राचिन पवार (रा. झाराप), राहुल अमित शिरसाट (रा. कुसाळ प्रशांत नितीन सावंत व प्रज्ञल नितीन सावंत (रा. वेताळ बांबर्डे), मदार सोनू उमरकर रा. कुडाळ) व राहुल सदानंद नलावडे। रा. पावशी) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, घटनेनंतर पजून जाणाऱ्या बलेनी कारने कुडाळ शहरातील गीता हॉटेलसमोरील मुख्य रस्त्यालगत असलेल्या एका दुकानाला जोरदार धडक दिली.

मंगळवेढा येथे आरटीओ ई चलनच्या नावावर एका पोलिस हवालदाराच्या बँक खात्यातून ८ लाख ४९ हजार रूपये लुटल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणी अज्ञात हॅकर विरुध्द नागेश निंबाळकर यांनी फिर्याद दिली असून पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान या घटनेमुळे मंगळवेढ्यात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, निंबाळकर हे गेल्या दोन वर्षापासून मंगळवेढा पोलिस ठाण्यात पोलिस हवालदार पदावर नोकरी करतात. तर वडिल शेती व्यवसाय करतात. वडिलांच्या शेती उत्पन्नातून येणारे पैसे त्यांच्या सेव्हींग खात्यावर होते. दि. २२ डिसेंबर रोजी निंबाळकर हे मंगळवेढ्यात असताना व्हॉटसअपवर ओळखीचे विक्रांत भोसले (रा. धायटी) यांच्या व्हॉटसअपवर एक आरटीओ ईचलन ॲप वरती पीडीएफ फाईल आली होती.


## नूतन वर्ष महाराष्ट्राचे, विकासाचे नवपर्व आणणारे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

नूतन वर्ष महाराष्ट्राचे, महाराष्ट्राच्या समृद्धीचे, विकासाचे नवपर्व आणणारे ठरेल, असा विश्वास व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना नववर्ष प्रारंभाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नवीन वर्ष प्रारंभाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात, 'सरत्या वर्षातील कटू प्रसंगांना विसरूया आणि सुमधूर आठवणींकडून प्रेरणा घेत, पुढे जाऊया. महाराष्ट्र सर्वच क्षेत्रात अग्रेसर, नेतृत्व करणारे राज्य आहे.

महाराष्ट्राच्या प्रगतीची पताका अशीच फडकत राहो, यासाठी आपण एकजूट करूया.



महाराष्ट्राच्या मातीत आव्हाने स्वीकारण्याची धमक आहे. आव्हाने आलीच, तर त्यावर मात करण्याचा निर्धार करुया. नवे वर्ष नवचैतन्य घेऊन येणारे, आशा, आकांक्षांना बळ देणारे ठरेल, अशी आशा व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस यांनी नववर्ष सर्वांसाठी आरोग्यदायी, सर्वच क्षेत्रात भरभराट, समृद्धी घेऊन येणारे ठरावे, अशा शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त

### अखेर माशी शिंकलीच मुंबईत या ठिकाणी मनसे आणि ठाकरे गटात होणार लढत

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात पहिल्यांदाच मनसे आणि ठाकरे गटाची युती झाल्याने या युतीकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. खासकरून मुंबईत ही युती काय चमत्कार करेल याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे. दोन्ही बंधूंमधील जागा वाटपाचा तिढाही सुटलेला आहे. उमेदवारांनी अर्जही भरले आहेत. आणि दोघेही येत्या ५ तारखेपासून सभांचा धडाका सुरू करणार आहेत. पण त्यापूर्वीच मुंबईत ठाकरे बंधूंच्या युतीत माशी शिंकली आहे. मुंबईतील २२७ पैकी एका जागेवर ठाकरे गट आणि मनसेमध्ये मैत्रीपूर्ण लढत होणार आहे. त्यामुळे या लढतीकडे सर्वांचं लक्ष लागलं आहेच. पण या एका जागेचा तिढा का सुटला नाही? याचीही चर्चा सुरू झाली आहे.


मुंबईत वार्ड क्रमांक ६७ मध्ये ठाकरे बंधूंच्या युतीत मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता आहे. या वार्डातून मनसे आणि शिवसेना ठाकरे या दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी अधिकृत अर्ज भरल्याची माहिती पुढे आली आहे. उमेदवारी अर्जाच्या छाननी प्रक्रियेनंतर मुंबई महानगरपालिकेकडून माहिती देण्यात आली. त्यात वॉर्ड क्रमांक ६७मध्ये ठाकरे सेना आणि मनसे या दोन्ही उमेदवारांची नावे असल्याचं आढळून आलं आहे. त्यामुळे या मतदारसंघातील एक उमेदवार माघार घेणार की या एका मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत होणार हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

मुंबईच्या प्रभाग क्रमांक ६७ मध्ये मनसे आणि ठाकरेंची सेना या दोन्ही पक्षांनी उमेदवार दिल्याने इथे नेमक काय होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. अंधेरी पश्चिमेकडील या प्रभागातून मनसेने कुशल धुरी यांना मैदानात उतरवलं आहे. तर ठाकरेंकडून शरद जाधव यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे आता प्रभाग क्रमांक ६७ मध्ये मैत्रीपूर्ण लढतीची चर्चा रंगू लागली आहे.

या मतदारसंघात एकूण १२ उमेदवार मैदानात आहेत. भाजपने दीपक कोतेकर यांना उमेदवारी दिली आहे. तर समाजवादी पार्टीने प्रकाश कोकरे आणि वंचितने पीर मोहम्मद शेख यांना उमेदवारी दिली आहे. या वॉर्डात मनसे, ठाकरे गट, भाजप आणि वंचित यांच्यात प्रमुख लढत होणार आहे. त्यामुळे मतदारसंघात कोण बाजी मारणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची उद्या २ जानेवारी ही शेवटची मुदत आहे. त्यामुळे उमेदवारी अर्ज मागे घेण्याची दोन्हीपैकी एका उमेदवाराला संधी आहे. जागा वाटपात ज्या पक्षाच्या वाट्याला ही जागा आली, त्या पक्षाचा उमेदवार कायम राहिल. आणि दुसऱ्या उमेदवाराला माघार घ्यावी लागणार आहे, असं चित्र आहे. मात्र, उमेदवारी मागे घेतली जाते की मैत्रीपूर्ण लढत होते, हे उद्याच समजणार आहे.

### विकसित, प्रगत महाराष्ट्राचा निर्धार नवीन वर्ष राज्याच्या प्रगतीचा सुवर्णकाळ ठरो

**मुंबई । प्रतिनिधी**



नवी स्वप्नं, नवी आशा, नव्या आकांक्षा आणि नवे संकल्प उरात बाळगून नविन वर्षाच्या स्वागतासाठी महाराष्ट्र सज्ज असून हे नवीन वर्ष राज्याच्या प्रगतीचा सुवर्णकाळ ठरो, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील नागरिकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, २०२५ हे वर्ष राज्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरले असून, आता २०२६ मध्ये आपल्याला अधिक वेगाने घोडदौड करायची आहे. सरत्या वर्षातील यशाचा वारसा पुढे नेत, नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी महाराष्ट्र सज्ज असल्याचे त्यांनी आपल्या शुभसंदेशात म्हटले आहे.

नवीन वर्ष आपल्या सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्य घेऊन येवो. आपण सर्वांनी मिळून महाराष्ट्राला देशातील क्रमांक एकचे राज्य बनवण्यासाठी कटिबद्ध होऊया असे आवाहन देखील उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते राज्य रस्ता सुरक्षा अभियानाचा शुभारंभ

## रस्ता सुरक्षा जनजागृती रॅलीस हिरवी झेंडी दाखवून केले मार्गस्थ

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात राज्य रस्ता सुरक्षा अभियान १ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी आणि सर्व संबंधित घटकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरुकता वाढविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. राज्य रस्ता सुरक्षा अभियान-२०२६ च्या शुभारंभानिमित्त रस्ता सुरक्षा जनजागृती रॅलीचे १ जानेवारी २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. रस्ता सुरक्षा अभियान-२०२६ च्या शुभारंभाचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

यावेळी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल, मोटार वाहन निरीक्षक भिमराज नागरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जानजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिक, वाहनचालक, शालेय विद्यार्थ्यांमध्ये मुख्यत: जनजागृती करण्यात येणार आहे. यावर्षीच्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिन्याची संकल्पना सडक सुरक्षा जीवन रक्षा अशी असून रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाच्या जीवनरक्षणाशी निगडीत आहे, हा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे.



सडक सुरक्षा जीवन रक्षा ही संकल्पना ठेवण्यात आली आहे. अतिवेगाने तसेच मद्यपान करुन वाहन चालवू नका, वाहने काळजीपूर्वक चालवा, स्वत:ची आणि इतरांची काळजी घ्यावी तसेच वाहने चालवताना मोबाईलचा वापर करु नका, समोरील वाहनापासून सुरक्षित अंतर ठेवा, वाहतुकीचे नियम पाळा अशा प्रकारचा संदेश देण्यात येत आहे. तसेच या रॅलीस मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून मार्गस्थ करण्यात आले. रस्ता सुरक्षा जनजागृती ही रॅली जिल्हाधिकारी कार्यालयातून सुरुवात होवून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, जालना येथे समारोप करण्यात आला. रॅलीत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचाऱ्यांसह मोटार वाहन ड्रायव्हिंग स्कुलने सहभाग नोंदविला.

# रोटरी क्लबतर्फे सूक्ष्म, लघु व मध्यम महिला उद्योजिकांसाठी आर्थिक साक्षरता शिबिर

**जालना । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे सूक्ष्म, लघु व मध्यम महिला उद्योजिकांसाठी रामनगर येथे २६ ते २७ डिसेंबरदरम्यान आयोजित दोन दिवशीय आर्थिक साक्षरता शिबिरात १०० महिलांनी सहभाग नोंदविला. मुंबई येथील श्रीमती पौर्णिमा शिरसकर, श्रीमती सीमा देसाई -नायर, श्रीमती सुमन पारेख या तज्ञ मार्गदर्शकांनी यावेळी मार्गदर्शन केले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी रामनगर ग्रामपंचायतचे सरपंच गोपाल मोरे, रोटरी क्लबच्या अध्यक्ष वर्षा वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, महिला सबलीकरणाच्या संचालिका अर्चना देशपांडे, सुनीती मदान यांच्यासह उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, रामनगर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष उपस्थित होते.



महिलांची उद्योजकतेसाठी असणारी मानसिकता, व्यवसाय उत्पादनासाठी लागणारे भौगोलिक क्षेत्र, तज्ञ मार्गदर्शन, अर्थसहाय्य उपलब्धता, व्यापारपेठ, विविध शासकीय योजना, अनुदान आदी विषयांवर उपस्थित महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरात सहभागी सर्व महिलांना महाराष्ट्र शासन द्वारा एमएसएमई प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या प्रमाणपत्रद्वारे शासकीय योजनांचा लाभ त्यांना मिळणार आहे. वैविध्यपूर्ण शिबिरामुळे शिबिरार्थी महिलांनी समाधान व्यक्त केले.

लवकरच त्यांना मुंबई येथे जाण्याची संधी उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्प प्रमुख किशोर देशपांडे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार प्रकल्प प्रमुख सचिन वाणी यांनी मानले.

# शौर्य, समता आणि स्वाभिमानाचे प्रतीक: भीमा कोरेगाव



**वसमत । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने संबोधी बुद्ध विहार हर्षनगर येथे शौर्य भिमा कोरेगाव दिनानिमित्त शूर वीरांना मानवंदेनेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता . या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून यादव चौरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अँड रणदिवे तेलगोटे, मेजर भगवान सुर्यतळ ,रघुपती सरोदे आदी मान्यवर धम्मपिठावर उपस्थित होते.

यावेळी भीमा कोरेगाव येथील प्रतिकृती विजय स्तंभांना मानवंदना देऊन सामूहिक आर एस नंद यांनी त्रिशरण पंचशील वंदना व इतर गाथा घेतल्या . याप्रसंगी ड रणधीर तेलगोटे व रघुपती सरोदे, आळणे मिलिद यांनी भीमा कोरेगाव येथे झालेला शूरवीरांचा इतिहास सांगून त्यांना मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमात सूत्रसंचालन भगवान सोनकांबळे यांनी केले तर साहेबराव सरोदे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास मेजर भगवान सुर्यतळ ,भीमराव शेळके, आनंदराव वाहेवळ, डॉ नामदेव मुळे,नामदेव इंगोले, खंडोजी पंडित , बार्टीचे मिलिंद आळणे,गुरुनाथ गाडेकर, संभाजी कसबे , नागसेन कांबळे सर, यांच्यासह उपासक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# अर्जुन खोतकरांनी विकासाच्या नावावर हवेत सटाक्या मारु नये, पुरावे दाखवून खोतकरांनी बाप दाखववावा अन्यथा, श्राद्ध घालावे

## माजी आमदार कैलास गोरंट्याल यांची खोतकरांवर टिका

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक एक गुरुवार रोजी दुपारी चार वाजता मिळालेल्या जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजताच राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेले माजी आमदार कैलास गोरंट्याल आणि शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांच्यात आता शाब्दिक युद्ध शिगेला पोहोचले आहे.

खोतकरांनी विकासाच्या नावावर हवेत सटाक्या मारू नयेत, हिंमत असेल तर कामाचे पुरावे देऊन बाप दाखवावा, अन्यथा श्राद्ध घालावे, अशा अत्यंत जहाल शब्दांत कैलास गोरंट्याल यांनी खोतकरांना आव्हान





दिले आहे.

जालना नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत झाल्यानंतर ही पहिलीच निवडणूक होत आहे. या निवडणुकीत शहराच्या विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी आहे. अर्जुन खोतकर यांनी शहरात केलेल्या विकासकामांचा दावा केला होता, त्यावर पलटवार करताना गोरंट्याल यांनी आक्रमक पवित्रा घेतला. ते म्हणाले की, केवळ घोषणा करून किंवा हवेत बोलून विकास होत नाही. जर खरोखरच विकासकामे केली असतील, तर त्याचे ठोस पुरावे जनतेसमोर मांडावेत.

जालन्याच्या राजकारणात खोतकर विरुद्ध गोरंट्याल हा सामना नवीन नाही. मात्र, महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने हा संघर्ष पुन्हा एकदा उफाळून आला आहे. गोरंट्याल यांच्या या ताज्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली असून, आता खोतकर याला काय प्रत्युत्तर देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या टीकेमुळे आगामी महानगरपालिका निवडणुकीत प्रचाराची पातळी किती टोकदार असेल, याचे संकेत मिळाले आहेत.



मा.श्रीमती मित्रू पी.एम. मॅडम मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांना वाढदिवसाच्या व नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!शुभेच्छा देताना, धर्मवीर छावा संघटनाचे उपजिल्हाप्रमुख जालना लक्ष्मण गाडेकर

# भावी डॉक्टरचा मृत्यू, सहा रुग्णांना जीवनदान

## बीएचएमएस विद्यार्थी धनंजय काळेचे मृत्यूनंतर अवयवदान

**जालना । प्रतिनिधी**

जालन्यातील भावी डॉक्टर धनंजय अनंत काळे (वय २५) यांचा दुचाकी अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. मात्र मृत्यूनंतरही धनंजयने सहा रुग्णांना जीवनदान देत माणुसकीचा आदर्श ठेवला आहे. कुटुंबीयांच्या पुढाकारातून धनंजयचे अवयवदान करण्यात आले असून नववर्षाच्या पहिल्याच दिवशी जालना ते पुणे ग्रीन कॉरिडॉर उभारण्यात आला.

संजीवनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधून अवयव संकलन करून ते पुणे येथील दोन रुग्णालये आणि छत्रपती संभाजीनगर येथील दोन रुग्णालयांमध्ये पाठवण्यात आले. फुफ्फुस, यकृत, दोन किडनी आणि





दोन रेटिना अशा अवयवांच्या प्रत्यारोपणामुळे सहा रुग्णांचे प्राण वाचणार आहेत.

ग्रीन कॉरिडॉरसाठी जालना पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात होता. पोलिसांनी सलामी देत अवयव घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेला मार्ग मोकळा करून दिला. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर आणि पोलीस प्रशासनाच्या समन्वयामुळे हे अभियान यशस्वी ठरले.

धनंजयच्या कुटुंबीयांच्या या निर्णयामुळे दुःखाच्या क्षणीही मानवतेचा दीप प्रज्वलित झाला असून नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सहा कुटुंबांमध्ये आशेचा नवा उजेड निर्माण झाला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**